The competition is being held in association with She Loves Tech (SLT). The competition gives startups an opportunity to win up to $50,000 from SLT, Teja Ventures and Asian Development Bank Ventures, special media and mentorship prizes, fast track access to SLT partner funds and accelerator programmes, and in-house advisory services, among others, KSUM sources said.

The challenge, "She Loves Tech 2021 Global Startup Competition," provides an international platform for women entrepreneurs as well as startups dedicated to improving the lives of women.

The applicants need to have a minimum viable product (MVP) and have raised less than $5 million. They should be an early-stage startup with either a tech product largely impacting women or a female founder or both.

Short-listed startups will get an opportunity to meet investors, get mentorship and funding support, free access to knowledge workshops and opening to pitch at global events.

## ACC Limited

CIN:L26940MH1936PLC002515
**Registered Office:** Cement House, 121, Maharshi Karve Road, Mumbai - 400 020
Tel. No.: 022-41593321; Fax No.: 022-66317458; Website: www.acclimited.com; e-mail: ACC-InvestorSupport@acclimited.com

### Extract of Consolidated Unaudited Results for the Quarter and Six months Ended 30-06-2021

(₹ in Crore)

| Particulars | 3 months ended 30-06-2021 | Preceding 3 months ended 31-03-2021 | Corresponding 3 months ended 30-06-2020 | Year to date figures for current period ended 30-06-2021 | Year to date figures for the previous period ended 30-06-2020 | Previous year ended 31-12-2020 |
|---|---|---|---|---|---|---|
| | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited |
| Total Revenue from Operations | 3,884.94 | 4,291.97 | 2,602.24 | 8,176.91 | 6,103.95 | 13,785.98 |
| Net Profit for the period (before exceptional item and tax) | 758.29 | 754.21 | 403.11 | 1,512.50 | 879.19 | 1,884.86 |
| Net Profit for the period before tax (after exceptional item) | 758.29 | 754.21 | 403.11 | 1,512.50 | 879.19 | 1,708.85 |
| Net Profit for the period after tax (after exceptional item) | 569.45 | 562.59 | 270.95 | 1,132.04 | 593.97 | 1,430.26 |
| Total Comprehensive Income for the period | 569.45 | 573.74 | 270.92 | 1,143.19 | 591.01 | 1,415.68 |
| Paid-up Equity Share Capital | | | | | | 187.99 |
| Other Equity (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | | | | 12,511.14 |
| Earnings per share of ₹ 10 each (not annualised): | | | | | | |
| (a) Basic ₹ | 30.32 | 29.96 | 14.43 | 60.28 | 31.63 | 76.16 |
| (b) Diluted ₹ | 30.24 | 29.88 | 14.39 | 60.13 | 31.55 | 75.98 |

Key numbers of Unaudited Standalone Results of the Company are as under :-

(₹ in Crore)

| Particulars | 3 months ended 30-06-2021 | Preceding 3 months ended 31-03-2021 | Corresponding 3 months ended 30-06-2020 | Year to date figures for current period ended 30-06-2021 | Year to date figures for the previous period ended 30-06-2020 | Previous year ended 31-12-2020 |
|---|---|---|---|---|---|---|
| | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited |
| Total Revenue from Operations | 3,884.80 | 4,291.88 | 2,600.83 | 8,176.68 | 6,102.54 | 13,784.54 |
| Net Profit for the period (before exceptional item and tax) | 760.42 | 748.89 | 399.81 | 1,509.31 | 872.64 | 1,863.79 |
| Net Profit for the period before tax (after exceptional item) | 722.32 | 748.89 | 399.81 | 1,471.21 | 872.64 | 1,687.78 |
| Net Profit for the period after tax (after exceptional item) | 533.81 | 557.41 | 267.99 | 1,091.22 | 587.93 | 1,414.94 |
| Total Comprehensive Income for the period | 533.81 | 568.57 | 267.99 | 1,102.38 | 585.04 | 1,400.40 |

**Note:**
The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the websites of the stock exchanges www.bseindia.com and www.nseindia.com and also on the Company's website www.acclimited.com.

**For and on behalf of the Board of Directors**

(Sridhar Balakrishnan)
**MANAGING DIRECTOR & CEO**
DIN:08699523

**Place:** Mumbai
**Date:** July 19, 2021

ACC

financialexp.epapr.in

## डाळींच्या साठ्यावरील निर्बंध मागे

**नवी दिल्ली :** देशात डाळींच्या किमती कमी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर; डाळींचा साठा करण्यावर घातलेल्या मर्यादेतून आयातदारांना सूट देण्याचे सरकारने सोमवारी जाहीर केले. याशिवाय डाळ मिलचे मालक आणि घाऊक विक्रेत्यांसाठीचे निकषही शिथिल केले आहेत.

आता साठा करण्यावरील मर्यादा केवळ तूर, उडीद, चणा व मसूर डाळीसाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत लागू राहणार आहेत. तथापि, संबंधितांना त्यांच्याकडील डाळींचा साठा ग्राहक व्यवहार विभागाच्या वेब पोर्टलवर जाहीर करणे सुरूच ठेवावे लागणार आहे.

'डाळी, जीवनाश्यक वस्तूंच्या दरांवर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून सरकारने घाऊक विक्रेते, मिल मालक आणि आयातदारांवर साठ्याबाबत घातलेल्या मर्यादेतून सूट दिली आहे', असे ट्वीट अन्न व ग्राहक व्यवहार मंत्री पीयूष गोयल यांनी केले. घाऊक विक्रेत्यांसाठी आता ५०० टनांची मर्यादा राहणार आहे, मात्र एका प्रकारच्या डाळीसाठी ती २०० टनांहून अधिक नसेल. मिलमालकांसाठी हीच मर्यादा ६ महिन्यांच्या उत्पादनाइतकी, किंवा वार्षिक स्थापित क्षमतेच्या ५० टक्के यापैकी जी अधिक असेल ती, इतकी राहील. किरकोळ विक्रेत्यांसाठी या मर्यादेत बदल केलेला नसून, ती ५ टन इतकीच असेल.

# मंत्रिमंडळात वंचितांना दिलेले स्थान काहींना असह्य

## विरोधकांच्या गोंधळावर मोदींची टीका; नव्या मंत्र्यांची ओळख करून न देताच आसनस्थ

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, सोमवारी, दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांच्या घोषणाबाजीची 'मुसळधार' कायम राहिल्याने केंद्रीय मंत्रिमंडळातील नव्या मंत्र्यांची ओळख करून न देताच पंतप्रधान नरेंद्र मोदी आसनस्थ झाले. आपल्या मंत्रिमंडळात दलित, आदिवासी, महिला मंत्री झाले ही बाब काही लोकांना सहन झालेली नाही, अशा शब्दांत मोदींनी लोकसभेत विरोधकांच्या गोंधळाला प्रत्युत्तर दिले.

'नव्या मंत्र्यांची मी ओळख करून दिली असे समजा' असे म्हणत मोदींनी लोकसभेत तसेच, राज्यसभेत मंत्र्यांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली. विरोधी सदस्यांच्या आक्रमक कृतीमुळे अचंबित झालेल्या केंद्र सरकारने आरोप केला की, विरोधकांनी संसदीय परंपरा मोडून औचित्यभंग केला आहे.

दलित, आदिवासी, ओबीसी, महिलांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले असून त्यांची ओळख मला सभागृहात करून देता आली असती. ग्रामीण भागांतून आलेल्या शेतकरी कुटुंबातील सदस्यांना मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास विभागातून आलेले लोकप्रतिनिधी मंत्री बनले आहेत.



### कामकाजाचा स्तर खालावला- बिर्ला

विरोधकांनी मोदींच्या भाषणात अडथळे आणल्याने लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला संतप्त झाले होते. विरोधी पक्षांच्या गटनेत्यांना त्यांनी आपापल्या सदस्यांना शांत करण्याची सूचना केली. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असून विरोधकांच्या गोंधळामुळे संसदीय कामकाजाचा स्तर खालावत आहे, अशी टिप्पणी बिर्ला यांनी केली.

### 'बाहुबली' लस

बाहूवर लस घ्या म्हणजे 'बाहुबली' व्हाल, अशी शाब्दिक कोटी करत पंतप्रधान मोदी यांनी नागरिकांना लस घेण्याचे आवाहन केले. करोनाविरोधात लढण्यासाठी लस घेणे आवश्यक आहे. आतापर्यंत ४० कोटी लोकांना लस देण्यात आली असून लसीकरण अधिक वेगाने केले जाईल, असे मोदी म्हणाले.

विरोधकांनी त्यांचे टाळ्या वाजवून अभिनंदन केले असते तर आनंद झाला असता. पण, दलित, आदिवासी, महिला मंत्री झाले ही बाब काही लोकांना स्वीकारता आलेली नाही, अशा शब्दांत मोदींनी लोकसभेत विरोधकांच्या गोंधळाला प्रत्युत्तर दिले. दलितांचा- आदिवासींचा गौरव झालेला काहींना पाहावत नाही, पसंतही पडलेले नाही. ही कोणती परंपरा आहे, अशी टीका मोदींनी राज्यसभेत केली. गेल्या आठवड्यात मोदींनी ३७ नव्या मंत्र्यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश केला होता.

संसदेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी मोदी म्हणाले की, संसदेत प्रभावी व समर्पक चर्चा झाली पाहिजे. लोकांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. विरोधकांनी केंद्र सरकारला तीक्ष्ण आणि कठोर प्रश्न विचारा, पण, सभागृहांमध्ये शांत वातावरणात उत्तरे देण्याची सरकारला संधीही द्या ! पण, सभागृहांचे कामकाज सुरू होताच विरोधकांनी सर्वसामान्यांना भेडसावणारी इंधनदरवाढ, बेरोजगारी, वादग्रस्त शेती कायदे तसेच, मंत्री, राजकीय नेते, पत्रकारांच्या मोबाइल फोन 'हॅक' करण्यात आल्याचे कथित प्रकरण आदी मुद्द्यांवरून घोषणाबाजी सुरू केली. या गोंधळात दोन्ही सभागृहांचे कामकाज पहिल्या सत्रात दोन वेळा तहकूब झाले. दुपारी दोननंतर कामकाज सुरू होताच गदारोळामुळे दोन्ही सभागृहे लगेच तहकूब झाली. सभागृहाचे कामकाज चालू न देणे हा लोकशाहीचा व नागरिकांचा अवमान असल्याचे राज्यसभेतील सभागृह नेते पियुष गोयल म्हणाले.

केंद्रीय संरक्षणमंत्री व लोकसभेतील सभागृह नेते राजनाथ सिंह यांनी विरोधकांच्या घोषणाबाजीवर संताप व्यक्त केला. आपल्या संसदेची सशक्त परंपरा असून ती नेहमी पाळली जाते. संसदेचे कायदे-नियम व प्रक्रियेला महत्त्व असते. केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार झाला असेल तर पंतप्रधान नव्या मंत्र्यांची सभागृहाला ओळख करून देतात. पंतप्रधानांचे म्हणणे संपूर्ण सभागृह शांततेने ऐकते. मी गेली २४ वर्षे संसदेचा सदस्य राहिलो आहे, आज पहिल्यांदा ही परंपरा मोडलेली पाहिली. काँग्रेस सदस्यांचे वर्तन अत्यंत दुर्दैवी आणि अशोभनीय असल्याचे राजनाथ सिंह म्हणाले. पंतप्रधानांच्या भाषणानंतर विरोधकांनी आपले मुद्दे मांडावेत, केंद्र सरकारची ऐकण्याचा तयारी आहे, असे आवाहन संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांनी केले पण, त्याचा विरोधी सदस्यांवर कोणताही परिणाम झाला नाही.

दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांनी सभाध्यक्षांसमोरील जागेत येऊन घोषणा दिल्या. राज्यसभेत विरोधी सदस्यांनी मोठे फलक आणून निदर्शने केली. संसदेच्या बाहेरही आप, शिरोमणी अकाली दल आदी सदस्यांनी शेती कायदे रद्द करण्याच्या मागणीसाठी हातात फलक घेऊन निषेध नोंदवला. इंधन दरवाढीचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी तृणमूल काँग्रेसचे सदस्य सायकलवरून संसदेत आले होते.

# 'पेगॅसस'द्वारे जागतिक पत्रकार, कार्यकर्त्यांवर नजर

## खशोगीच्या प्रेयसीवरही पाळत

**वृत्तसंस्था, बोस्टन**

**ग्लोबल मीडिया** कन्सॉर्टियमने आतापर्यंत गोळा केलेल्या माहितीनुसार इस्रायलच्या एनएसओ समूहाने पेगॅसस या स्पायवेअरच्या माध्यमातून पत्रकार व कार्यकर्ते यांना लक्ष्य केले आहे. यात मानवी हक्क कार्यकर्ते, राजकीय बंडखोर यांचा समावेश होता.

पन्नास हजार सेलफोन क्रमांक पॅरिसच्या फॉरबिडन स्टोरिज व ॲम्नेस्टी इंटरनॅशनलला मिळाले असून ते १६ वृत्तसंस्थांना देण्यात आले. यात पत्रकारांनी १ हजार सेलफोन क्रमांकांची ओळख पटवली असून ते पन्नास देशांतील आहेत. त्यांच्यावर एनएसओकडून पाळत ठेवली जात होती. त्यात १८९ पत्रकार, ६०० राजकीय नेते व सरकारी अधिकारी, तसेच ६५ उद्योग अधिकारी, ८५ मानवी हक्क कार्यकर्ते यांचा समावेश आहे. अनेक देशांच्या राष्ट्रप्रमुखांवरही पाळत ठेवली जात होती, असे 'दी वॉशिंग्टन पोस्ट' या कन्सॉर्टियम सदस्य देशाने म्हटले आहे. दी असोसिएटेड प्रेस, रॉयटर्स, सीएनएन, दी वॉल स्ट्रीट जर्नल, ल माँद व दी फायनान्शियल टाइम्स यांच्या पत्रकारांवर पेगॅसस या स्पायवेअरच्या माध्यमातून पाळत ठेवल्याचे उघड झाले आहे.

ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने म्हटले आहे, की फोरेन्सिक संशोधकांनी दिलेल्या माहितीनुसार दी वॉशिंग्टन पोस्टचा मारला गेलेला पत्रकार जमाल खशोगी याची प्रेयसी हातिस सेनगिझ हिच्या फोनमध्ये हे स्पायवेअर बसवण्यात आले आहे. इस्तंबूल येथील दूतावासात २०१८ मध्ये खशोगी यांचा खून करण्यात आल्यानंतर चारच दिवसात त्याच्या प्रेयसीच्या फोनमध्ये पेगॅसस स्पायवेअर बसवण्यात आले होते.

एनएसओ समूहाने एपी वृत्तसंस्थेने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली नाहीत. फॉरबिडन स्टोरीजची बातमी खोटी व कपोलकल्पित असल्याचे एनएसओने म्हटले आहे. कंपनीने दावा केला आहे, की दहशतवादी व गुन्हेगारांवरच आम्ही पाळत ठेवतो.

### 'नियमांचे उल्लंघन'



टीकाकारांनी एनएसओचे दावे खोटे असल्याचा आरोप केला असून एनएसओ थेट उच्च तंत्र हेरगिरी करीत असल्याचे स्पष्ट केले आहे. पेगॅसस स्पायवेअरचा गैरवापर करण्यात आला असून खासगी हेरगिरी उद्योगातील नियमांचे यात उल्लंघन करण्यात आले आहे.



## 'मिशन जीतेगा पंजाब' यशस्वी करणार- सिद्धू

**चंडीगड :** 'माझा प्रवास नुकताच सुरू झाला आहे', असे मुख्यमंत्री अमरिंदर सिंग यांच्यासोबत सुमारे महिनाभर सुरू असलेल्या पक्षांतर्गत संघर्षानंतर रविवारी पंजाब काँग्रेसच्या अध्यक्षपदी नेमणूक झालेले नवज्योतसिंग सिद्धू यांनी सोमवारी सांगितले.

क्रिकेटमधील कारकीर्दीनंतर राजकारणात आलेले सिद्धू यांनी पक्षश्रेष्ठींचे आभार मानले. 'जीतेगा पंजाब' हे मिशन पूर्ण करण्यासाठी आणि राज्यात पक्षसंघटना बळकट करण्यासाठी आपण काँग्रेस कुटुंबाच्या प्रत्येक सदस्यासोबत मी काम करीन, असे त्यांनी सांगितले.

'आपले समान स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंजाबमधील काँग्रेसचा अभेद्य किल्ला जिंकण्यासाठी आपण सारे काम करूया. माझ्यावर विश्वास दाखवून मला ही महत्त्वाची जबाबदारी दिल्याबद्दल मी पक्षाध्यक्ष सोनिया गांधी, राहुल व प्रियंका गांधी यांचा कृतज्ञ आहे', असे सिद्धू यांनी ट्विटरवर लिहिले.

सुनील जाखड यांची जागा घेणारे सिद्धू यांना अमरिंदरसिंग यांचा जोरदार विरोध असतानाही या पदावर नियुक्त करण्यात आले आहे.

# रुळांवर माती; कोकण रेल्वे ठप्प

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई, रत्नागिरी :** मुसळधार पावसामुळे करमाळी ते थिविम दरम्यान जुना गोवा बोगद्यात चिखल व माती रुळावर आल्याने कोकण रेल्वेवरील वाहतूक सोमवारी पहाटे पावणे पाच वाजल्यापासून ठप्प झाली. या मार्गावरील अनेक गाड्या दुसऱ्या मार्गावर वळवण्यात आल्या. काही प्रवाशांना दुसऱ्या रेल्वेगाड्यांमध्ये बसविण्यात आले. रात्री उशिरापर्यंत वाहतूक पूर्वपदावर आली नव्हती.

गेले आठ दिवस कोकण विभागात मुसळधार पाऊस कोसळत आहे. पावसामुळे सलग चौथ्या दिवशी कोकण रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले आहे. चार दिवसांपूर्वी दक्षिण रेल्वे मार्गावर दरड कोसळली होती. त्यानंतर दोन दिवस मुंबईत मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे तीन दिवस कोकण रेल्वे मार्गावरील काही गाड्यांचे वेळापत्रक विस्कळीत झाले असतानाच सोमवारीही करमाळी ते थिविम दरम्यान रुळांवर माती आणि चिखल वाहत आला.

### रेल्वेतील प्रवासी रस्तेमार्गे



सीएसएमटी, एलटीटीतून १८ तारखेला सुटलेल्या मंगळुरु, तिरुवनंतपुरम आणि पुण्यातून एर्नाकुलमसाठी सुटलेल्या गाड्यांमधील प्रवाशांना थिवी ते मडगाव रस्त्यामार्गे आणि पुढे मडगावपासून रेल्वेने मंगळुरु, तिरुवनंतपुरम, एर्नाकुलमपर्यंत नेण्यात आले. १९ जुलैला सुटलेल्या सीएसएमटी ते मडगाव गाडीतील प्रवाशांनाही थिवी ते मडगाव रस्तेमार्गे नेण्यात आल्याची माहिती मध्य व कोकण रेल्वेने दिली. याशिवाय एलटीटी ते तिरुवनंतपुरम, निजामुद्दीन ते एर्नाकुलम, अमृतसर ते कोचुवेली, एलटीटी ते एर्नाकुलम यासह अन्य गाड्या पनवेल, कर्जत, पुणे, मिरज, हुबळी, कृष्णराजपुरम, इरोड, शोरानूर, मडगाव, लोंडा मार्गे वळवण्यात आल्या.

नेत्रावती एक्स्प्रेस थिविम स्थानकात, वास्को एक्स्प्रेस पेडणे येथे, राजधानी एक्स्प्रेस कुडाळला थांबवून ठेवण्यात आली. सकाळपासून कर्नाटक-केरळकडे जाणारी सर्व वाहतूक ठप्प झाली. अनेक एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या तर काही गाड्या पर्यायी मार्गाने वळवण्यात आल्या. १९ जुलैला सुटणारी मडगाव-सीएसएमटी कोकणकन्या एक्स्प्रेस रद्द करण्यात आली. त्याचबरोबर २० जुलैला सुटणारी सीएसएमटी ते मडगावही रद्द करण्यात आली आहे. यात प्रवाशांचे हाल झाले. दरम्यान, रुळांवरील माती काढण्यासाठी रेल्वेची यंत्रणा कामाला लागली. सोमवारी दुपारी बारा वाजेपर्यंत कोकण रेल्वे पूर्ववत होईल, असे सांगितले जात होते. परंतु काम करताना पावसामुळे अनेक अडचणी येत होत्या.

# पश्चिम बंगालमध्ये आता टाटांसाठी पायघड्या!

## राज्य सरकारची गुंतवणुकीसाठी बोलणी

**पीटीआय, कोलकाता**

**१३ वर्षांपूर्वी** सिंगूरमधील भूसंपादन विरोधी आंदोलनामुळे टाटा उद्योगाच्या छोट्या मोटार प्रकल्पाला पश्चिम बंगालमधून निघून जाणे भाग पडले असतानाच, राज्यात मोठ्या प्रमाणावरील गुंतवणुकीसाठी टाटांशी बोलणी सुरू आहेत, असे राज्याचे उद्योग व माहिती तंत्रज्ञान मंत्री पार्थ चॅटर्जी यांनी म्हटले आहे.

रोजगार निर्मितीला तृणमूल काँग्रेस सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे अधोरेखित करतानाच, कंपन्यांना प्रोत्साहन अनुदान त्यांच्या रोजगारनिर्मितीच्या क्षमतेवर अवलंबून राहील, असे चॅटर्जी म्हणाले. कुठल्याही बड्या औद्योगिक घराण्यामार्फत दोन मोठे निर्मिती उद्योग उभारले जावेत, अशी ममता बॅनर्जी सरकारची इच्छा असल्याचेही त्यांनी सांगितले.

'आमचे टाटांशी कधीही कुठल्या प्रकारचे शत्रुत्व नव्हते, किंवा आम्ही त्यांच्याशी लढलोही नाही. या देशातील तसेच परदेशातीलही सर्वात आदरणीय औद्योगिक घराण्यांपैकी ते एक आहेत. सिंगूरमध्ये जो विचका झाला, त्यासाठी तुम्ही टाटांना दोष देऊ शकत नाही. समस्या डाव्या आघाडीच्या सरकारबाबत आणि त्याच्या जबरीने भूसंपादन करण्याच्या धोरणाबाबत होती. बंगालमध्ये गुंतवणूक करण्यासाठी टाटा समूहाचे नेहमीच स्वागत आहे', असे तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीसही असलेले चॅटर्जी यांनी सांगितले. टाटा समूहाने कोलकात्यात कार्यालये थाटण्यासाठी, आणखी एक टाटा केंद्र स्थापन करण्यात रस दाखवला आहे, असेही चॅटर्जी म्हणाले.

**गोखले ऑर्थोपेडिक सेंटर**
एम. आय. डी. सी. डोंबिवली, पूर्व.
फोन - ८४५१०७०९०७

**जाहीर सूचना**

गोखले ऑर्थोपेडिक सेंटर तर्फे सूचित करण्यात येत आहे की, दिनांक ८ एप्रिल १९९५ ते ३१ डिसेंबर २०१० पर्यंत असलेले अंतर रुग्ण विभागातील मेडिकल रेकॉर्ड्स हॉस्पिटलच्या नीती व शासकीय मानदंडा नुसार नष्ट करण्यात येणार आहे. तरी आपणास निवेदन आहे की जर आपण या रुग्णालयात वरील कालावधीतील आपले रेकॉर्ड्स सुरक्षित ठेवण्यासाठी इच्छूक असल्यास ३० दिवसांच्या आत हॉस्पिटलशी संपर्क साधावा.

अंतिम दिनांक: २०/०८/२०२१
आदेशानुसार
मेडिकल डायरेक्टर

ALKYL
**अल्काईल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय :** ४०१-४०७, निर्माण व्यापार केन्द्र, प्लॉट नं. १०, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३. **टेलि. क्र. :** ०२२-६७९४६६१८; **फॅक्स क्र. :** ०२२-६७९४६६६६;
**ई-मेल :** legal@alkylamines.com; **वेबसाइट :** www.alkylamines.com
**सीआयएन :** एल९९९९९एमएच१९७९पीएलसी०२१७९६

**सूचना**

याद्वारा सूचना देण्यात येते की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ४७ यासह वाचलेल्या रेग्युलेशन २९ च्या अनुसार ३० जून २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष, इतर गोष्टींसमवेत, विचारात घेण्याकरिता आणि मान्य करण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा मंगळवार, ०३ ऑगस्ट २०२१ रोजी घेण्यात येणार आहे.

ही माहिती **www.alkyamines.com** या कंपनीच्या वेबसाइटवरसुद्धा प्रस्तुत करण्यात आली आहे आणि **www.bseindia.com** व **www.nseindia.com** या स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइट्सवरूनसुद्धा प्राप्त करता येईल.

**अल्काईल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड करिता**
स्वाक्षरी/-
**चिंतामणी डी. थत्ते**
महाव्यवस्थापक (विधि) व कंपनी सचिव

**स्थळ :** नवी मुंबई
**तारीख :** १९ जुलै २०२१

स्टॅन स्वामींबाबत उच्च न्यायालयाला आदर

# 'खटल्याविना किती काळ कारागृहात खितपत ठेवायचे ?'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** शहरी नक्षलवाद प्रकरणी वैद्यकीय जामिनाच्या प्रतीक्षेत असताना नुकतेच निधन झालेले धर्मगुरू स्टॅन स्वामी यांच्या कार्याबाबत आदर असल्याचे नमूद करून खटल्याविना वर्षानुवर्षे कारागृहात खितपत पडलेल्या कैद्यांच्या मुद्द्यावर उच्च न्यायालयाने सोमवारी बोट ठेवले. 'कैद्यांना खटल्याविना किती काळ कारागृहात खितपत ठेवायचे ? जलद खटला हा प्रत्येक आरोपीचा मूलभूत अधिकार आहे', असेही न्यायालयाने प्रामुख्याने नमूद केले.

न्यायमूर्ती एस. एस. शिंदे आणि न्यायमूर्ती एन. जे. जमादार यांच्या खंडपीठाने सांगितले की, स्टॅन स्वामी यांचे व्यक्तिमत्त्व अद्भूत होते. आम्हाला न्यायालयीन कामातून फारसा वेळ मिळत नाही. परंतु स्वामी यांचा अंत्यविधी (ऑनलाईन पद्धतीने) पाहिला. त्यावेळी त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्याबद्दल आणि



त्यांच्या कार्याबद्दल केलेली भाषणे ऐकली. कायदेशीरदृष्ट्या त्यांच्याविरोधात जे काही आरोप आहे तो एक वेगळा मुद्दा आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

खटल्याविना कैद्यांना वर्षानुवर्षे कारागृहात खितपत पडावे लागते याची आम्हाला खंत आहे. स्वामी यांच्यासह त्यांच्या सहआरोपींनी केलेल्या वैद्यकीय जामिनासाठीच्या याचिकेवर आम्ही नेहमीच पारदर्शी सुनावणी घेतली आहे. आपल्याला न्यायालयाप्रती काहीही तक्रार नसल्याचे स्वामींचे वकील मिहिर देसाई यांनी म्हटले होते. याच न्यायालयाने या प्रकरणातील आरोपी व प्रसिद्ध कवी वरवरा राव यांना तपास यंत्रणेच्या तीव्र विरोधानंतरही वैद्यकीय कारणास्तव सहा महिन्यांचा तात्पुरता जामीन मंजूर केला होता, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले.

## काश्मीर : चकमकीत २ दहशतवादी ठार

**श्रीनगर :** जम्मू- काश्मीरच्या शोपियाँ जिल्ह्यात सुरक्षा दलांशी रात्रभर झालेल्या चकमकीत लष्कर-ए-तैयबाच्या एका वरिष्ठ कमांडरसह दोन दहशतवादी ठार झाले. इश्फाक दार ऊर्फ अबू अक्रम हा केवळ सुरक्षा दलांवरील हल्ल्यांसाठी जबाबदार नव्हता, तर त्याने नागरिकांनाही ठार मारले होते, असे पोलिसांनी सांगितले.

शोपियाँ जिल्ह्याच्या चक-इ-सिद्दिकी खान भागात दहशतवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी रविवारी रात्री या भागात शोधमोहीम सुरू केली होती.

# करोनेतर आजारांसाठी शुल्क निश्चितीचा अधिकार राज्य सरकारला नाही : सर्वोच्च न्यायालय

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** करोनेतर आजारांवर उपचार करण्यासाठी खासगी रुग्णालयांनी किती शुल्क आकारावे हे निश्चित करण्याचे अधिकार राज्य सरकारला नाहीत, असा निर्वाळा देत सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निकालावर शिक्कामोर्तब केले.

आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार राज्य सरकारला केवळ करोनाग्रस्तांच्या उपचारासंदर्भात शुल्क निश्चित करण्याचे अधिकार आहेत. इतर आजारांच्या रुग्णांकडून किती शुल्क आकारावे, हा विषय आपत्ती व्यवस्थापनात मोडत नाही. खासगी रुग्णालये सरकारकडून कोणतीही मदत घेत नाहीत. राज्य सरकारचा हा निर्णय रद्द करावा, अशी याचिका नागपूर खंडपीठात करण्यात आली होती. उच्च न्यायालयाने २३ ऑक्टोबर २०२० ला राज्य सरकारचा आदेश रद्द केला होता. सर्वोच्च न्यायालयात न्या. धनंजय चंद्रचूड व न्या. एम. आर. शहा यांनी उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला.

**एसीसी लिमिटेड**
सीआयएन:L26940MH1936PLC002515
**नोंदणीकृत कार्यालय:** सिमेंट हाऊस, १२१ महर्षी कर्वे मार्ग, मुंबई - ४०० ०२०
दूरध्वनी क्र.: ०२२-४१५९३३२१; फॅक्स क्र.: ०२२-६६३१७४५८; वेबसाईट: www.acclimited.com; ईमेल: ACC-InvestorSupport@acclimited.com

**३०-०६-२०२१ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी आणि सहामाहीसाठी एकत्रित अलेखापरीक्षित निष्कर्षांचा सारांश**

(₹ कोटीमध्ये)

| तपशील | तिमाही समाप्ती 30-06-2021 अलेखापरीक्षित | मागील तिमाही समाप्ती ३१-०३-२०२१ अलेखापरीक्षित | तद्नुरुप तिमाही समाप्ती ३०-०६-२०२० अलेखापरीक्षित | चालू वर्षातील समाप्ती कालावधीसाठी ह्या तारखेपर्यंतचे आकडे ३०-०६-२०२१ अलेखापरीक्षित | मागील वर्षातील समाप्ती कालावधीसाठी ह्या तारखेपर्यंतचे आकडे ३०-०६-२०२० अलेखापरीक्षित | मागील वर्ष समाप्ती ३१-१२-२०२० लेखापरीक्षित |
|---|---|---|---|---|---|---|
| कामकाजातून एकूण महसूल | ३,८८४.९४ | ४,२९१.९७ | २,६०२.२४ | ८,१७६.९१ | ६,१०३.९५ | १३,७८५.९८ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक बाबी व करपूर्व) | ७५८.२९ | ७५४.२१ | ४०३.११ | १,५१२.५० | ८७९.१९ | १,८८४.८६ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा (अपवादात्मक बाबींपश्चात) | ७५८.२९ | ७५४.२१ | ४०३.११ | १,५१२.५० | ८७९.१९ | १,७०८.८५ |
| कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा (अपवादात्मक बाबींपश्चात) | ५६९.४५ | ५६२.५९ | २७०.९५ | १,१३२.०४ | ५९३.९७ | १,४३०.२६ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न | ५६९.४५ | ५७३.७४ | २७०.९२ | १,१४३.१९ | ५९१.०१ | १,४१५.६८ |
| भरणा झालेले समभाग भांडवल | | | | | | १८७.९९ |
| इतर समभाग (पुनर्मुल्यांकन राखीव वगळून) मागील वर्षाच्या लेखापरीक्षित बॅलन्स शीटमध्ये दर्शविल्याप्रमाणे | | | | | | १२,५११.१४ |
| प्रत्येकी ₹ १० च्या प्रत्येक समभागामागे मिळकत (वार्षिकीकृत न केलेली): | | | | | | |
| (अ) मूळ ₹ | ३०.३२ | २९.९६ | १४.४३ | ६०.२८ | ३१.६३ | ७६.१६ |
| (ब) सौम्यीकृत ₹ | ३०.२४ | २९.८८ | १४.३९ | ६०.१३ | ३१.५५ | ७५.९८ |

कंपनीच्या स्वतंत्र अलेखापरीक्षित निष्कर्षांचे मुख्य आकडे:-

(₹ कोटीमध्ये)

| तपशील | तिमाही समाप्ती ३०-०६-२०२१ अलेखापरीक्षित | मागील तिमाही समाप्ती ३१-०३-२०२१ अलेखापरीक्षित | तद्नुरुप तिमाही समाप्ती ३०-०६-२०२० अलेखापरीक्षित | चालू वर्षातील समाप्ती कालावधीसाठी ह्या तारखेपर्यंतचे आकडे ३०-०६-२०२१ अलेखापरीक्षित | मागील वर्षातील समाप्ती कालावधीसाठी ह्या तारखेपर्यंतचे आकडे ३०-०६-२०२० अलेखापरीक्षित | मागील वर्ष समाप्ती ३१-१२-२०२० लेखापरीक्षित |
|---|---|---|---|---|---|---|
| कामकाजातून एकूण महसूल | ३,८८४.८० | ४,२९१.८८ | २,६००.८३ | ८,१७६.६८ | ६,१०२.५४ | १३,७८४.५४ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक बाबी व करपूर्व) | ७६०.४२ | ७४८.८९ | ३९९.८१ | १,५०९.३१ | ८७२.६४ | १,८६३.७९ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा (अपवादात्मक बाबींपश्चात) | ७२२.३२ | ७४८.८९ | ३९९.८१ | १,४७१.२१ | ८७२.६४ | १,६८७.७८ |
| कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा (अपवादात्मक बाबींपश्चात) | ५३३.८१ | ५५७.४१ | २६७.९९ | १,०९१.२२ | ५८७.९३ | १,४१४.९४ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न | ५३३.८१ | ५६८.५७ | २६७.९९ | १,१०२.३८ | ५८५.०४ | १,४००.४० |

नोंद:
वरील माहिती म्हणजे सेबी (सुचिकरण आणि इतर प्रकटन आवश्यकता) नियमने २०१५ च्या नियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार स्वरुपाचा संक्षिप्त आढावा आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांच्या संपूर्ण तपशील हा स्टॉक एक्सचेंजसच्या www.bseindia.com आणि www.nseindia.com ह्या वेबसाईट्सवर आणि कंपनीच्या www.acclimited.com ह्या वेबसाईट्सवर उपलब्ध आहे.

संचालकीय मंडळासाठी आणि त्यांच्या वतीने
(श्रीधर बाळकृष्णन)
व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ
डीआयएन: 08699523

स्थळ: मुंबई
तारीख: १९ जुलै २०२१
ACC